# <u>जाहीर सूचना</u>

दिनांक २६/०२/२०२०

उपविभागीय अधिकारी यवतमाळ यांचे कार्यालयाकडून जाहीर सूचित करण्यात येते की,शासकीय मोकळ्या जागा आझाद मैदान व समता मैदान (पोस्टल ग्राउंड) भाडेतत्वावर देण्याबाबत कार्यपद्धती मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ नागपूर यांचे आदेश दि.१६/०८/२०१८ नुसार तसेच महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय दि. ३ मार्च २००७ मधील तरतुदी तसेच मा.जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे पत्र क्र./कली/राजस्व-२/कावी/५१४/२०१८ दि.१६/०८/२०१८ नुसार निश्चित केलेली आहे,त्यास अनुसरून आझाद मैदान व समता मैदान (पोस्टल ग्राउंड) भाडे तत्वावर देण्यात येईल याची नोंद घ्यावी.अर्ज करताना सदर पत्रात व शासन निर्णयात नमूद अटी / शर्ती नुसार पूर्तता करूनच अर्ज सादर करावे.

उपविभागीय अधिकारी
यवतमाळ

उपविभागीय अधिकारी सत्यमेव जयते यवतमाळ

सहपत्र-

१) शासन निर्णय दि.३/३/२००७

२) मा.जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे पत्र दि.१६/०८/२०१८

Scanned with CamScanner

क्रमांक/कलि/राजस्व-२/कावि/ 514 /२०१८.
जिल्हाधिकारी कार्यालय,यवतमाळ
दि.16 /०८/२०१८.

प्रती,

उपविभागीय अधिकारी,
यवतमाळ.

विषय- Writ Petition No.1597/2018 filled by Satish Vitthalrao Pawar Versus State of Maharashtra and others.

संदर्भ- मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ नागपूर यांचे आदेश दि.१७/०४/२०१८.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आझाद मैदान व समता मैदान (पोस्टल ग्राउंड) भाडेतत्वावर देण्याबाबतची आपणास खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करुन देण्यात येत आहे.

## आझाद मैदान व समता मैदान (पोस्टल ग्राउंड) भाडेतत्वावर देण्याबाबतची कार्यपध्दती

यवतमाळ मुख्यालयी असलेले शासकिय जमिनीवरील आझाद मैदान व समता मैदान (पोस्टल ग्राउंड) विविध तात्पुरत्या प्रयोजनार्थ भाडयाने देण्यासंदर्भात येणा-या विविध अडचणी तसेच या अनुषंगाने मा.न्यायालयात दाखल होणा-या याचिका इत्यादी बाबींचा विचार करता उपरोक्त मैदान विविध तात्पुरत्या प्रयोजनार्थ भाडयाने देण्यासंदर्भात खालील प्रमाणे कार्यपध्दती /अटी व शर्ती निश्चित करण्यात येत आहे.

१. मैदान ज्या कालावधी करिता पाहिजे त्या कालावधीच्या प्रथम दिनाकांच्या कमीत कमी २० दिवस ते जास्तीत जास्त ३० दिवस पुर्व कालावधीतच अर्ज करता येईल. सदर नमुद कालावधीचे पुर्वी अर्ज केल्यास ते स्विकारल्या जाणार नाहीत.

## अर्ज करावयाचे कालावधीच उदाहरण

उदा. १० जानेवारी २०१९ ते १९ जानेवारी २०१९ या कालावधीकरीता मैदान भाडेतत्वावर मिळण्याकरिता अर्ज करावयाचा असल्यास ११ ते २० डिसेंबर २०१८ या कालावधीत कार्यालयीन दिवशी व वेळेत अर्ज करता येईल. ०९ डिसेंबर २०१८ किंवा त्यापुर्वीचे तारखेत अर्ज करता येणार नाहीत.

तथापी १ जानेवारी २०१९ ते १० जानेवारी २०१९ या कालावधी करिता मैदान भाडेतत्वावर मिळण्याकरिता १ ते १० डिसेंबर २०१८या कालावधीत एक अर्ज नसेल अशा परिस्थितीत ११ डिसेंबर २०१८ ते ३० डिसेंबर २०१८ या कालावधीत कार्यालयीन दिवशी व वेळेत अर्ज प्राप्त झाल्यास ज्या अर्जदाराचा अर्ज प्रथम येईल त्यास उपरोक्त कालावधीत मैदान भाडेतत्वावर उपलब्ध करुन देता येईल.

२. अर्जदाराला अर्ज स्वत: उपविभागीय अधिकारी,यवतमाळ यांचेकडे सादर करावा लागेल. त्रयस्थ व्यक्तीने सादर केलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

३. एकाच कालावधी करिता एका पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास प्रथम येणा-यास प्राधान्य या तत्वावर मैदान भाडेतत्वावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. अर्जदाराने अर्ज करतांना त्याला कोणत्या कालावधी करिता व कोणत्या प्रयोजनार्थ मैदान भाडेतत्वावर पाहिजे,संपुर्ण मैदान पाहिजे कि मैदानाचा काही भाग पाहिजे त्याच्या चतुःसिमा तसेच मैदान भाडेतत्वावर उपलब्ध करुन देण्यासाठी ज्या काही अटी व शर्ती राहतील त्या अर्जदारास मान्य राहतील याचा उल्लेख अर्जात करावा व परिपुर्ण माहिती भरुन अर्ज कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत उपविभागीय अधिकारी,यवतमाळ यांचेकडे समक्ष सादर करावा.

५. अर्जदारास अर्जासोबत चारित्र्य प्रमाणपत्र (पोलिस विभागाचे) जोडणे बंधनकारक राहील. अर्ज सादर करते वेळी सोबत ओळख म्हणुन आधारकार्ड/निवडणुक ओळखपत्र सोबत ठेवावे अन्यथा अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत.

६. उपविभागीय अधिकारी,यवतमाळ यांनी त्यांचे कडे मैदान मागणीबाबत अर्जदार अर्ज घेऊन आल्यावर तो तपासून घ्यावा त्यात त्रुटी नसल्यास त्यावर तारीख व वेळ नमुद करुन संबधित

Scanned with CamScanner

लिपीकाकडे रजिस्टर मध्ये नोंद करुन पुढील कार्यवाहीस पाठवावा.अर्जात त्रृटी आढळल्यास त्या त्याच वेळी अर्जावर नमुद कराव्यात व तसे अर्जदारास लगेच लेखी कळवावे.

७. एका वेळी फक्त १० दिवस करिताच मैदान उपलब्ध करुन देण्यात येईल.तथापी केवळ सर्कशीकरिता ४५ दिवस करिता ( सर्कस उभारणे आणि काढणे हा कालावधी अंतर्भुत ) मैदान उपलब्ध करुन देण्यात येईल.

८. मैदान भाडेतत्वावर मिळण्याकरिता एका व्यक्तीस एका महिण्यात फक्त एकदाच अर्ज करता येईल.

९. शासकिय मैदान प्राथम्याने क्रिडा प्रयोजनार्थ मैदानाची मागणी असल्यास अशा अर्जदारास उपलब्ध करुन देता येईल. तदनंतर इतर प्रयोजनासाठी मागणी केलेल्या अर्जदारांचे अर्ज विचारात घेण्यात येतील.

१०.एखादया क्रिडा संस्थेच्या लेटरपॅड वर मैदान मागणीचा अर्ज केला याचा अर्थ सदर अर्ज क्रिडा प्रयोजनासाठीच आहे असा होणार नाही.अर्जात नमुद प्रयोजन तपासुन सदर प्रयोजन क्रिडा प्रयोजनात मोडत नसल्यास अर्जाचा प्राथम्यक्रमात मोडणार नाही.

११.वरील प्रमाणे अर्जदाराचा अर्ज उपविभागीय अधिकारी,यवतमाळ यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर अर्जामध्ये नमुद मैदान मागणीचे प्रयोजन व कालावधी इ.बाबी तपासून मैदान भाडेतत्वावर उपलब्ध करुन देता येत असल्यास अर्जदारास लेखी पत्र देतील सदर पत्रात अनामत रक्कम, भाडयाची रक्कम, नाहरकत प्रमाणपत्र व इतर आवश्यक बाबींचा उल्लेख करतील या सर्व बाबी कोणत्या दिनांकापुर्वी सादर करणे अर्जदारास बंधनकारक आहे याचाही उल्लेख पत्रात नमुद करतील.

१२. ज्या स्थितीत जमिनीचा/ मैदानाचा ताबा संस्थेस /अजर्दारासदेण्यात आला आहे त्याच स्थितीत मैदाने संबधित अधिका-यास परत करण्याची हमी संस्थेकडुन लेखी हमीपत्राच्या स्वरुपात घेण्यात यावी.तसेच त्याच स्थितीत शासनास परत न केल्यास त्यांच्या डागडुजीचा खर्च त्यांच्या अनामत रकमेतुन वजा करण्यात येऊन उर्वरित अनामत रक्कम संपुर्ण भाडेवसुली केल्यानंतर संस्थेस परत करण्याची जबाबदारी उपविभागीय कार्यालयाची राहील.

१३. जमिनीचा/मैदानाचा ताबा संबधितांना देण्यापुर्वी संपुर्ण भाडे आणि अनामत रक्कम आगाऊ वसुल करण्याची जबाबदारी उपविभागीय कार्यालयाची राहील.

१४. अर्जदाराने सदर कार्यक्रमासाठी पोलिस अधिक्षक अथवा स्थानिक पोलिस अधिकारी यांची आवश्यक ती पुर्वपरवानगी घ्यावी त्याच वेळी ध्वनीक्षेपकाच्या वापरामुळे ध्वनीप्रदुषण होऊ नये याची दक्षता घ्यावी तसेच पोलिस आयुक्त/ पोलिस अधिक्षक अथवा स्थानिक पोलिस अधिकारी यांनी घालून दिलेल्या कालावधीपर्यंतच ध्वनीक्षेपकाचा वापर करावा आणि सदर समारंभामुळे आसपासच्या रहिवाशांना त्रास होणार नाही तथा वाहतुकीस कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही, याचीही दक्षता अर्जदाराने घ्यावी.

१५. शासकिय जमिनीवरील कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता ज्या प्राधिका-यांच्या मंजुरी आवश्यक आहेत त्या प्राप्त करण्याची जबाबदारी संबधीत संस्थेची राहिल. शासनाने जमिन वापरण्यास परवानगी दिली याचा अर्थ सर्व प्रकारची मंजुरी सबंधित कार्यक्रमास प्राप्त झाली असे समजता येणार नाही.

१६.अर्जदारास मैदान भाडेतत्वावर उपलब्ध करुन देतांना ज्या अटी व शर्ती घालण्यात येतील त्याचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहील.

१७.अर्जदाराने अटी व शर्तीचे उल्लघंन केल्यास अनामत रक्कम व भाडयाची रक्कम उपविभागीय अधिकारी,यवतमाळ यांनी जप्त करावी.दिलेली परवानगी तात्काळ रद्द करुन मैदान खाली करुन घ्यावे.

१८.ज्या अर्जदारास भाडेतत्वावर मैदान उपलब्ध करुन देण्यात आले त्या अर्जदाराने दुस-या व्यक्तीस परस्पर मैदान उपलब्ध करुन दिल्याचे निष्पन्न झाल्यास अर्जदार फौजदारी कार्यवाहीस पात्र

Scanned with CamScanner

१९.सबळ कारणास्तव तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास दिलेली परवानगी रद्द करण्याचे अधिकारी,उपविभागीय अधिकारी,यवतमाळ यांचेकडे निहीत राहतील.

वरील प्रमाणे आझाद मैदान व समता मैदान भाडेतत्वावर देण्याबाबतची कार्यपध्दती पुढील तीन महिण्यात ऑनलाईन प्रणालीव्दारे विकसित करण्याकरिता रु.२५०००/- (अक्षरी पंचवीस हजार) सेतु समिती निधी मधुन खर्च करण्याकरिता प्रस्ताव ~~त्व~~ सादर करावा.

(डॉ.राजेश देशमुख)
जिल्हाधिकारी,यवतमाळ

O/C

16/8/18

आवक जावक लिपीक
जिल्हाधिकारी कार्यालय,यवतमाळ

Scanned with CamScanner

**शासकीय मोकळया जागा / मैदाने तसेच शासकीय / निमशासकीय संस्था / महामंडळे व खाजगी संस्थांना देण्यात आलेल्या शासकीय जमिनीतील मोकळया जागा विविध तात्पुरत्या प्रयोजनाकरीता भाडयाने देण्याबाबतचे धोरण**

**मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून**

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक : जमीन १०९४/प्र.क्र.५८/ज-१

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक : ३ मार्च, २००७.

**वाचा** :- शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्रमांक एलएनडी ३९५४-II, दि.४.११.१९५४.

**प्रस्तावना :-**

राज्यातील मोकळ्या शासकीय जमिनी / मैदाने प्रदर्शन, प्रासंगिक सोहळे (विवाह व स्वागत समारंभ), करमणुकीचे कार्यक्रम, धार्मिक कार्यक्रम, सर्कस वगैरे प्रयोजनासाठी मर्यादित कालावधीकरीता देताना शासन परिपत्रक दि.४.११.१९५४ मध्ये विहित केलेल्या दरानुसार भाड्याची आकारणी करुन देण्यात येत होती. तसेच काही जिल्ह्यांमध्ये शासनाच्या भुईभाडे आकारणीबाबत असलेल्या, निरनिराळया शासन निर्णय / परिपत्रक / पत्रानुसार विहित केलेल्या दराप्रमाणे भाडे आकारणी करुन उक्त प्रयोजनांसाठी, मोकळ्या शासकीय जमिनी / मैदाने देण्यात येत होती. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची सुसूत्रता नव्हती. तसेच भाडे आकारणीच्या दरामध्येही सुधारणा करणे आवश्यक होते.

या सर्व बाबींचा विचार करुन मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून (याबाबत स्वतंत्र शासन निर्णय विहित केलेला आहे) इतर जिल्ह्यातील शासकीय मोकळया जागा / मैदाने तसेच शासकीय / निमशासकीय संस्था / महामंडळे व खाजगी संस्थांना देण्यात आलेल्या शासकीय जमिनीतील मोकळया जागा विविध प्रासंगिक कार्यक्रमासाठी तात्पुरत्या प्रयोजनाकरीता भाडयाने देण्याबाबतचे धोरण निश्चित करण्याकरीता शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

महानगर पालिका / महापालिका क्षेत्र, 'अ', 'ब', 'क' वर्ग नगरपालिका आणि ग्रामीण क्षेत्रातील रिक्त शासकीय जागा / मैदाने, प्रदशने, प्रासंगिक सोहळे (विवाह व स्वागत समारंभ), करमणुकीचे कार्यक्रम, धार्मिक कार्यक्रम, सर्कस व अन्य तात्पुरत्या प्रयोजनासाठी मर्यादित कालावधीकरीता भाड्याने देताना पुढीलप्रमाणे भाडे आकारण्यात यावे :-

| अ.क्र. | प्रयोजन | महानगरपालिका | महानगरपालिका क्षेत्र |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | | क्षेत्रामध्ये भाड्याचा दर (प्रतिदिन) | वगळून इतरत्र भाड्याचा दर (प्रतिदिन) |
| १ | विवाह सोहळा व स्वागत समारंभ | रु.५००/- दर प्रति १००० चौ.फूट/प्रतिदिन | रु.२५०/- दर प्रति १००० चौ. फूट/ प्रतिदिन |
| २ | प्रदर्शने :-<br>अ) वाणिज्यिक / औद्योगिक<br>ब) सेवाभावी संस्था<br>क) शासकीय / निमशासकीय संस्था व महामंडळे | <br>रु.१००/- दर प्रति १०० चौ. मीटर<br>रु.५०/- दर प्रति १०० चौ. मीटर<br>रु.२५/- दर प्रति १०० चौ. मीटर | <br>रु.५०/- दर प्रति १०० चौ. मीटर<br>रु.२५/- दर प्रति १०० चौ. मीटर<br>रु.१०/- दर प्रति १०० चौ. मीटर |
| २ | सर्कस, प्रासंगिक सोहळे व इतर प्रयोजने | रु.२५/- दर प्रति १०० चौ. मीटर | रु.१०/- दर प्रति १०० चौ. मीटर |
| ३ | धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम | रु.१०/- दर प्रति १०० चौ. मीटर | रु.५/- दर प्रति १०० चौ. मीटर |

वरील दर सदर आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षांपर्यत लागू राहतील. त्यानंतर या दरामध्ये प्रत्येक ३ वर्षांनी सरसकट १०% वाढ करावी व अशी वाढ करताना जवळच्या दशक रुपयात समायोजित करावी. या विषयीचे संपूर्ण अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.

२. यासंबंधी पुढील अटी व शर्ती विहित करण्यात येत आहेत :-

१) (अ) राज्यातील मोकळ्या शासकीय जमिनी / मैदाने प्रदर्शने, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम आणि करमणूकीचे कार्यक्रम यांना भाड्याने देताना एका वेळी १० दिवसांपेक्षा जास्त दिवसांसाठी देण्यात येऊ नयेत. सर्कशीकरीता ४५ दिवसांपेक्षा (सर्कस उभारणे आणि काढणे हा कालावधी अंतर्भूत) जास्त कालावधीसाठी भाड्याने देण्यात येऊ नये.

(आ) निश्चित केलेल्या भाड्याच्या दरानुसार येणाऱ्या भाड्याच्या रकमेएवढी रक्कम अनामत रक्कम म्हणून घेण्यात यावी.

(इ) शासकीय मैदानांचा वापर प्राथम्याने क्रिडा व प्रयोजनासाठी करण्यात यावा. त्यानंतरही मैदाने रिक्त राहिल्यास ती विषयाधीन प्रयोजनासाठी देण्यात यावीत.

(ई) ज्या स्थितीत जमिनीचा / मैदानाचा ताबा संस्थेस देण्यात आला आहे त्याच स्थितीत मैदाने संबंधित अधिकाऱ्यास परत करण्याची हमी संस्थेकडून लेखी हमीपत्राच्या स्वरुपात घेण्यात यावी. तसेच त्याच स्थितीत शासनास परत न केल्यास त्यांच्या डागडुगीचा खर्च त्यांच्या

अनामत रकमेतून वजा करण्यात येऊन उर्वरित अनामत रक्कम संपूर्ण भाडेवसूली केल्यानंतर संस्थेस परत करण्यात यावी.

(उ) अशी मैदाने / मोकळ्या शासकीय जमिनी भाडयाने मिळण्यासाठीची नोंदणी जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात यावी व अशी मैदाने / मोकळ्या शासकीय जागा भाड्याने देताना जिल्हाधिकारी यांनी प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर भाडेपट्ट्याने वितरण करावे.

(ऊ) या मोकळ्या जमिनी आणि मैदाने वाणिज्यिक संस्था, सेवाभावी संस्था आणि शासकीय संस्था यांना प्रासंगिक प्रयोजनासाठी उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

(ए) जमिनीचा / मैदानाचा ताबा संबंधितांना देण्यापूर्वी संपूर्ण भाडे आणि अनामत रक्कम आगाऊ वसूल करण्यात यावी.

(ऐ) अर्जदाराने सदर कार्यक्रमासाठी पोलिस आयुक्त / पोलिस अधिक्षक अथवा स्थानिक पोलिस अधिकारी यांची आवश्यक ती पूर्वपरवानगी घ्यावी त्याचे वेळी ध्वनीक्षेपकाच्या वापरामुळे ध्वनीप्रदुषण होऊ नये याची दक्षता घ्यावी तसेच पोलिस आयुक्त / पोलिस अधिक्षक अथवा स्थानिक पोलिस अधिकारी यांनी घालून दिलेल्या कालावधीपर्यंतच ध्वनीक्षेपकाचा वापर करावा आणि सदर समारंभामुळे आसपासच्या रहिवाशांना त्रास होणार नाही तथा वाहतुकीस कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही, याचीही दक्षता अर्जदाराने घ्यावी.

(ओ) शासकीय जमिनीवरील कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता ज्या प्राधिकाऱ्यांच्या मंजूरी आवश्यक आहेत त्या प्राप्त करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहिल. शासनाने जमीन वापरण्यास परवानगी दिली याचा अर्थ सर्व प्रकारची मंजूरी संबंधित कार्यक्रमास प्राप्त झाली असे समजता येणार नाही.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या (अनौपचारिक संदर्भ क्रमांक ८३७/व्यय-९, दि.१८.११.२००६ अन्वये) सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

सही/-

**( ज. का. घरत )**

**उप सचिव,**

**महसूल व वन विभाग**

**प्रत :**

सर्व विभागीय आयुक्त

सर्व जिल्हाधिकारी

सर्व पोलिस आयुक्त / पोलिस अधिक्षक

महालेखापाल,महाराष्ट्र राज्य (१)मुंबई (लेखानुज्ञेयता / लेखापरीक्षा)

महालेखापाल,महाराष्ट्र राज्य (२), नागपूर (लेखानुज्ञेयता / लेखापरीक्षा)

गृह विभाग (विशा ५), मंत्रालय, मुंबई.

वित्त विभाग (व्यय-९), मंत्रालय, मुंबई.
महसूल विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव व नियंत्रण अधिकारी
महसूल व वन विभागातील सर्व कार्यासने
कार्यासन ज-१, महसूल व वन विभाग निवडनस्ती.